लोकमत

# बाबासाहेब सौदागर यांनी उलगडली गाण्यांची जन्मकथा

**नाशिक :** गाणे, कविता सुचते कशी येथून पासून त्याच्या चालीसह बारकाव्यांचा उलगडा प्रसिद्ध गीतकार, कवी, अभिनेते बाबासाहेब सौदागर यांनी केला.

पंचवटीतील के. के. वाघ तंत्रनिकेतनतर्फे सिनेमा रसिकांसाठी बाबासाहेब सौदागर यांचे 'माझ्या गाण्यांची जन्मकथा' या विषयावर व्याख्यनाचे आयोजन केले होते. या व्याख्यानात, सौदागर यांनी त्यांच्या काही प्रसिद्ध गाण्यांमागील प्रवास सांगितला. अध्यक्षस्थानी श्रीकांत बेणी होते. बेणी यांनी सौदागर यांचा गीत प्रवास नवीन इच्छुक लेखक, गीतकारांसाठी मार्गदर्शक असल्याचे सांगितले. कार्यक्रमास संस्थेच्या विश्वस्त शकुंतला वाघ, अध्यक्ष समीर वाघ, जनसंपर्क संचालक अजिंक्य वाघ, सचिव प्रा. के. एस. बंदी, प्राचार्य प्रकाश कडवे, समन्वयक दीपाली जोरी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन योजना कुमावत यांनी केले.

Nashik Main
Page No. 4 Feb 25, 2025
Powered by: erelego.com